


## खासदार श्रीरंग बारणे यांची नेरळ, कर्जत रेल्वे स्टेशनला भेट

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4 थे

www.metrocityvrutant.in शनिवार दिनांक २४/05/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन ‖ पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 115 ‖ RNI - MAHMAR /2021/51259 ‖ metrocity924@gmail.com

# काहींचे स्वभाव हट्टी; तर मी पण डबल हट्टी

## -अजित पवार



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**बारामती : माळेगाव कारखान्याबाबत खुप सगळे प्रयत्न केले. मात्र काहींचे स्वभाव हट्टी आहेत. मी पण हट्टी, डबल हट्टी आहे. अरे बाबा थांबाना कुठेतरी. आपल्या वयाचा विचार करुन, इतर नवीन युवकांना संधी कधी मिळणार, निवडुन येऊन देखील काही जण अडीच वर्षे तर काही जण पाच वर्षे बोर्ड मिटींगला फिरकलेही नाही, हिच कारखान्याविषयी आपुलकी होती का,अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुरुशिष्यांवर शरसंधान साधत ‘माळेगांव’च्या निवडणुकीत शड्डू ठोकला.**

माळेगांव कारखान्याच्या निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर बारामतीत आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात पवार बोलत होते. यावेळी पवार पुढे म्हणाले, ‘माळेगाव’ मध्ये काहींच्या काहीबाबत चुका झाल्या. मी करताना चुका मान्य करणारा कार्यकर्ता आहे. ‘छत्रपती’ला पुर्ण पॅनल नविन केला. याच धर्तीवर ‘माळेगाव’ ला देखील बदल करण्याचे सुतोवाच पवार यांनी केले.मी तुम्हाला शब्द देतो.माझ्यासमोर ज्यांना लढायचं त्यांना लढु द्या, ज्यांना पॅनल करायचं त्यांना करु द्या. माझी हरकत नाही. मी देखील लढणार, पॅनल करणारं आहे. समोरच्याला तुल्यबळ समजून लढणार. मला ही एकदाचं बघायच आहे की काय होतंय ते, असा इशारा पवार यांनी विरोधकांना दिला.

माझ्या हातात ज्या गोष्टी आहेत. त्या सगळ्याचा वापर करणार आहे. उगाच कोणावर अवलंबून राहणार नाही. सगळ्या यंत्रणा कामाला लावणार असून ,जे काय करायचे ते मी करणार आहे, असे सांगत पवार यांनी ‘माळेगांव’च्या निवडणुकीचे राजकीय गांभीर्य अधोरेखित केले.

# राजेंद्र हगवणेला 28 मे पर्यंत पोलीस कोठडी!



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : जमीन खरेदीसाठी माहेरहून दोन कोटी रुपये आणण्यासाठी सुनेचा शारीरिक आणि मानसिक छळ करून तिच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याच्या प्रकरणात पसार असलेले राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) पक्षाचे मुळशीचे माजी तालुकाध्यक्ष राजेंद्र हगवणे आणि त्यांचे चिरंजीव सुशील हगवणे यांना प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी एन. एच. बारी यांनी पाच दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.वैष्णवी यांच्या आत्महत्येनंतर हगवणे पिता-पुत्र पसार झाले होते. पिंपरी-चिंचवड पोलिसांनी त्यांना शुक्रवारी अटक केली. त्यानंतर शिवाजीनगर सत्र न्यायालयात त्यांना हजर करण्यात आले त्यावेळी कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.हगवणे यांची सून वैष्णवी शशांक हगवणे (वय २३, रा. मुक्ताई गार्डनजवळ, भुकूम) हिने आत्महत्या केल्याचे उघडकीस आले.

याप्रकरणी तिचे वडील आनंद ऊर्फ अनिल बाळासाहेब कस्पटे (वय ५१, रा. वाकड) यांनी बावधन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

त्यानुसार वैष्णवीचा पती शशांक, सासू लता, नणंद करिष्मा यांना १८ मे रोजी अटक करण्यात आली. न्यायालयाने त्यांना २६ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. मात्र, वैष्णवीचे सासरे राजेंद्र तुकाराम हगवणे आणि दीर सुशील राजेंद्र हगवणे हे दोघे पसार होते.

# वैष्णवीला न्याय मिळावा ही आमची सर्वांची नैतिक जबाबदारी -आदिती तटकरे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुण्यातील हुंडाबळी ठरलेल्या वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात सर्व आरोपींना पोलिसांच्या वतीने अटक करण्यात आली.



स्वर्गीय वैष्णवी हगवणे यांचे पालक कस्पटे कुटुंबीयांची आज महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी भेट घेतली, त्यांचे सांत्वन केले, यावेळी आपल्या प्रतिक्रिया देताना अदिती तटकरे यांनी म्हटले आहे की आपण वैष्णवीच्या कुटुंबाच्या दुःखात सहभागी असून ही घटना अत्यंत वेदनादायक आहे. या कठीण काळात आपण या कस्पटे कुटुंबांच्या पाठीशी असून संपूर्ण महाराष्ट्र शासन हे या कुटुंबाच्या पाठीशी ताकदीने उभा आहे. वैष्णवीला न्याय मिळावा ही आमची सर्वांची नैतिक जबाबदारी आहे „ज्या व्यक्तींनी तिच्यावर अन्याय केला त्यांना कडक शिक्षा व्हावी यासाठी आम्ही सर्वजण प्रयत्न करणार आहोत.

न्यायाच्या प्रक्रियेत कोणतीही तडजोड होऊ देणार नाही तसेच वैष्णवीचे बाळ सुखरूप असणे गरजेचे आहे त्यासाठी बाळाची चांगल्या डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी व्हावी ; या संपूर्ण प्रकरणावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार या घटनेवर बारकाईने लक्ष देत असून पीडित कुटुंबीयांना आम्ही नक्की न्याय मिळवून देऊ अशी प्रतिक्रिया आदिती तटकरे यांनी दिली.

यावेळी महिला व बालविकास आयुक्त श्रीमती नयना गुंडे, श्रीमती वैशाली नागवडे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक नाना काटे, पुण्याच्या राष्ट्रवादीच्या नेत्या रूपाली ठोंबरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# पुण्यात मैत्रिणीचा गळा दाबून खून!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



हडपसर : भागात मैत्रिणीचा गळा दाबून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मैत्रिणीचा खून केल्यानंतर तो पोलीस ठाण्यात हजर झाला आहे. अनिता लोंढे (२७) असे खून झालेल्या तरुणीचे नाव आहे. याप्रकरणी आरोपी राहुल शिवाजी मिसाळ याला ताब्यात घेण्यात आले आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हडपसर भागातील भंडलकरनगर शेवळवाडी येथे ही घटना घडली आहे. अनिता आणि आरोपी राहुल हे एकत्र राहत होते. आरोपी याने त्याची मैत्रीण अनिता हिचा गळा दाबून खून केला आहे. त्यानंतर तो यवत पोलीस ठाण्यात हजर झाला, अशी माहिती हडपसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय मोगले यांनी दिली.

# “मुलींनो प्रेमविवाह करू नका ”,वैष्णवीच्या वडिलांची कळकळीची विनंती!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण अवघ्या महाराष्ट्राला माहीत झाले आहे.

सासरच्या व्यक्तींकडून होणाऱ्या जाचाला कंटाळून वैष्णवीने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले. वैष्णवीचा प्रेम विवाह होता. वैष्णवीचे वडील अनिल कस्पटे यांनी इतर मुलींना प्रेमात न पडण्याचा सल्ला दिला आहे. मुलींनी प्रेमात पडू नये, अशी त्यांनी कळकळीची विनंती केली आहे. अनिल कस्पटे हे पत्रकारांशी बोलत होते.अनिल कस्पटे यांनी तरुणींना एक कळकळीची विनंती केली आहे.

ते म्हणाले, मुलींना माझं एक सांगणं आहे. प्रेमात पडताना विचार करून प्रेम करा.

समोरच्या व्यक्तीची माहिती काढा. पार्श्वभूमी तपासा, त्याची परिस्थिती काय आहे, वागणूक आणि बोलणं कसं आहे, ते बघा. कुणी तुम्हाला भुरळ घालू नये. अन्यथा माझ्या मुलीसोबत जे घडलं ते तुमच्यासोबत घडू नये. मुलींना एक कळकळीची विनंती आहे.

तुम्ही प्रेमात पडू नका. आई वडिलांचा विचार,सल्ला घेऊन लग्न करा. आई- वडील म्हणतील त्यांच्याशी लग्न करा, असं अनिल कस्पटे यांनी आवाहन केलं आहे.

# खासदार श्रीरंग बारणे यांची नेरळ, कर्जत रेल्वे स्टेशनला भेट

## रेल्वे स्टेशनवरील कामांची घेतली माहिती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी - मावळ लोकसभा मतदारसंघातील नेरळ रेल्वे स्टेशन सुधारण्याचे काम गेल्या दोन वर्षांपासून काम सुरु आहे. त्यातून रेल्वे स्टेशनचा सुधार केला जात आहे. दोन लिफ्ट, सरकते जिने, रेल्वे स्टेशनवर बैठक कक्ष, लिफ्ट, पार्कीगची व्यवस्था, स्वच्छतागृह आणि रेल्वे स्टेशनचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. नेरळ रेल्वे स्थानकाचा कायापालट होणार असल्याचे मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले.खासदार बारणे यांनी काही दिवसांपूर्वी पुणे विभागात येणा-या रेल्वे स्टेशनला भेट दिली होती. त्यानंतर शुक्रवारी मुंबई विभागात येणा-या कर्जत, नेरळ रेल्वे स्टेशनला भेट दिली. रेल्वे स्टेशन सुधारणा, दर्जेदार कामे करण्याबाबत अधिका-यांना सूचना दिल्या. या वेळी वरिष्ठ अभियंता नझीब जी, व्यवस्थापक अजय कुमार, पी एम प्रकाश, व्ही जी अल्लूरे, एस के यादव, शिवसेना जिल्हा प्रमुख संतोषशेठ भोईर, शिवसेना तालुका प्रमुख सुदाम पवळी,भाजपा तालुकाध्यक्ष राजेश भगत, मनोहर थोरवे, माजी नगरसेवक संकेत भासे, माजी सभापती राहुल पिसे,शिवसेना नेरळ शहर प्रमुख किसन शिंदे, युवासेना विधानसभा प्रमुख प्रसाद थोरवे, सुरेश राणे अंकुश दाभणे, दिलीप ताम्हाणे, रमेश मते व मोठ्या संख्येने कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते.खासदार बारणे म्हणाले, नेरळ रेल्वे स्टेशनचे सुशोभीकरण करण्यात येत आहे. काम वेगात सुरु आहे. या कामावर प्रवासी संघटनेनेही समाधान व्यक्त केले. पावसाळ्यात नेरळ स्टेशन परिसरातील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये पाणी शिरते. या पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था रेल्वे आणि ग्रामपंचायतीने करावी. विकास प्राधिकरणाला विश्वासात घ्यावे. स्ट्रॉम वॉटरची व्यवस्था करावी. नेरळ ते कर्जत दरम्यान लोकल रेल्वेने प्रवास केला. कर्जत रेल्वे स्टेशनचीही पाहणी केली. तेथील असुविधांची माहिती घेतली. त्या समस्या सोडविण्याचे निर्देश अधिका-यांना दिले. पनवेल ते कर्जत दरम्यान नवीन रेल्वे मार्ग होत आहे. त्यामुळे कर्जत येथे नवीन स्टेशन उभारण्यात येत आहे. जुन्या स्टेशनवरुन एक्सप्रेस धावतात. त्यामुळे रेल्वे स्टेशनना सुविधा द्याव्यात. रेल्वे स्टेशनची सुधारणा करावी.

लिफ्ट, सरकते जिने करावेत. भिसेगावला जोडणाऱ्या ओव्हर ब्रिजचे काम एमएमआरडीच्या माध्यमातून सुरु आहे.

त्या कामाला गती द्यावी.खासदार बारणे यांनी कर्जत पर्यंत लोकलमधून प्रवास केला. प्रवाशांशी संवाद साधला. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. प्रवासी संघटनेच्या पदाधिका-यांशी संवाद साधला. त्यांचे गा-हाणे ऐकून घेतले.

# महावितरणची प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावा!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची संचालकांना मागणी



**भोसरी विधानसभा मतदारसंघातील महावितरण वीज पुरवठा सेवा सक्षम करण्यासाठी प्रशासनाने प्रस्तावित विकासकामे, शाखा विभाजन, उपकेंद्र उभारण्याच्या कामाला गती द्यावी, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**

**महावितरण संदर्भात विविध प्रलंबित विकास कामांसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळाचे संचालक विश्वास पाठक यांच्यासोबत मुंबईत बैठक घेण्यात आली. यावेळी मतदारसंघांतर्गत येणाऱ्या विद्युत विषयक कामांचा आढावा आमदार महेश लांडगे यांनी घेतला.**

भोसरी मतदारसंघांमध्ये वीज पुरवठा खंडित होऊ नये यासाठी उपकेंद्रांची मागणी करण्यात येत आहे. हे उपकेंद्र उभारले जावेत यासाठी आज सूचना केल्या आहेत. मान्सूनपूर्वक कामांमध्ये विद्युत विषय कामांना प्राधान्य दिले जावे. जेणेकरून पावसाळ्यात पुढील चार महिने नागरिकांकडून वीज पुरवठा खंडित होण्याबाबत तक्रारी येऊ नये याची दक्षता घ्यावी अशी सूचना देखील करण्यात आली आहे. सक्षमपणे बीज पुरवठा करण्याबाबत आवश्यक उपाययोजना आणि प्रस्तावित कामांना गती देण्याबाबत प्रशासन सकारात्मक आहे. याबाबत त्या-त्या विभागाकडे पाठपुरावा करून प्रश्न मार्गी लावण्याबाबत निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना संचालकांनी दिले आहेत.

: भोसरी मतदारसंघांमध्ये औद्योगिक तसेच घरगुती व्यावसायिक व इतर ग्राहकांना सुरळीत वीज पुरवठा व्हावा यासाठी उपकेंद्रांची उभारणी करण्यात यावी. चऱ्होली व मोशी शाखा विभाजन, मोशी सफारी पार्क येथील उच्चदाब वाहिनीसाठी उपकेंद्रसाठी जागेची उपलब्धता करणे, प्राइड वर्ल्ड सिटी येथील अति उच्चदाब उपकेंद्र जागा उपलब्धता,

सेंचुरी ऐन्का येथे अतिरिक्त दोन रोहित्र उभारणे. मतदारसंघातील 22 KV रोहित्रांचे रूपांतर 11 KV रोहित्रांमध्ये करणे., आरडीएसएस योजनेतील प्रस्तावित कामे मार्गी लावणे. 353.94 कोटी रुपयांच्या डीपीआरला मंजुरीचा प्रस्ताव प्रलंबित आहे.

त्याचा पाठपुरावा करणे, औद्योगिक क्षेत्रातील वीज समस्या सोडवण्यासाठी उपाययोजना करणे, अशा महत्वपूर्ण मुद्द्यांवर बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली.

भोसरी विधानसभा मतदारसंघ अंतर्गत विद्युत विषयक प्रलंबित कामांचा आढावा बैठकीत घेतला. प्राधान्याने मान्सूनपूर्व कामांना गती द्यावी. पावसाळ्यामध्ये खंडित वीज पुरवठ्याचा सामना नागरिकांना करावा लागू नये या दृष्टीने उपाययोजना करण्याचेही सूचित केले. शाखा विभाजन, उच्च दाब वीज उपकेंद्र, मनुष्यबळ निर्मिती हे विषय मार्गी लागल्यास वीज पुरवठा सक्षम करण्यास मदत होणार आहे.

याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा करणार आहे.

- महेश लांडगे, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# लघुउद्योग संघटनेच्या वतीने उद्योगमंत्री उदय सामंत यांना निवेदन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



कुदळवाडी, चिखली या औद्योगिक परिसरातील उद्योजकासाठी आहे त्याच ठिकाणी औद्योगिक झोन जाहीर करावा किंवा औद्योगिक महामंडळाच्या जागेत पुर्नवसन करावे असे निवेदन मा. उद्योगमंत्री उदयजी सामंत यांना पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेच्या वतीने देण्यात आले. या प्रसंगी संघटनेचे अध्यक्ष - संदीप बेलसरे, सचिव – जयंत कड, संचालक - नवनाथ वायाळ, संजय सातव उपस्थित होते.

याप्रसंगी उद्योगमंत्र्यानी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांचे बरोबर बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. तसेच महाराष्ट्र राज्यातील उद्योग मंत्रालय या परिसरातील उद्योजकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील असेही सांगितले.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कुदळवाडी, पवारवस्ती, जाधववाडी, चिखली या औद्योगिक परिसरातील लघुउद्योजकावर बांधकामे निष्कासन कारवाई झालेली असून जवळपास सर्वच लघुउद्योजकांची बांधकामे पाडण्यात आलेली आहेत. त्यांच्या सर्व प्रकारच्या महागड्या मशीन देखील काढून घेण्यास वेळ दिलेला नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या या कारवाईमुळे लघुउद्योजकांचे व कामगारांचे मानसिक स्वास्थ बिघडले आहे. त्यांचे करोडो रुपयांचे नुकसान झालेले आहे.

सन 2019-20 ला पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वे प्रमाणे हा झोन महानगरपालिकेने प्रारूप आराखड्यामध्ये औद्योगिक झोन म्हणून जाहीर केलेला आहे. या परिसरातील जागा लघुउद्योजकांच्या स्वत:च्या मालकीच्या असल्यामुळे सदर जागेवर महानगरपालिकेच्या पूर्वीच्या गुंठेवारीच्या नियमानुसार रितसर परवानगी घेऊन बांधकाम केले जाईल. कारवाई केलेले अनेक उद्योजक पूर्वीच्या गुंठेवारी नियमाप्रमाणे बांधकाम परवाना मंजूर करून आपली इंडस्ट्री उभारण्याची इच्छा व्यक्त करीत आहे. तरी महापालिकेत एक वेगळा बांधकाम विभाग निर्माण करावा व पूर्वीच्या गुंठेवारी नियमानुसार बांधकाम मंजुरीसाठी नियमावली सुटसुटीत करून व त्वरित गुंठेवारी नियमाप्रमाणे परवानगी देणेबाबत निर्णय घ्यावा. जेणे करून येत्या जून मध्ये पावसाळा चालू झाल्यास बांधकामे करणे शक्य होणार नाही व मशिनचे व ऑर्डरचे मोठ्याप्रमात नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वरील परिसरातील लघुउद्योजकांसाठी आहे त्याच ठिकाणी कारखाना पुन्हा सुरू करण्यासाठी इंडस्ट्रीयल झोन जाहीर करावा, व त्वरित परवानगी देण्याची कार्यवाही व्हावी. व उद्योग वाचवावेत. तसेच बेरोजगार होणारे कामगारही वाचवावेत

सध्या ज्या लघुउद्योजकांची बांधकामे पाडलेली आहेत त्यांचे वीज कनेक्शन सुरू करणेबाबत महावितरण कार्यालयास आदेश द्यावेत. जेणे करून मोठया कंपन्यांची ऑर्डर पूर्ण होईल व उद्योजकांची आर्थिक उलाढाल सुरळीत होईल व उद्योजकानी घेतलेल्या कर्जाचे हप्ते देखील वेळेवर भरता येतील.

वरील औद्योगिक परिसरातील कारवाईत लघुउद्योजकांचे अतोनात नुकसान झालेले आहे. साधारणपणे एक गुंठ्यात शॉप असेल तर त्या उद्योजकाचे एक ते दिड कोटीचे रुपयांचे नुकसान झालेले आहे. महापालिकेने किंवा राज्य शासनाने प्रती गुंठा एक ते दिड कोटी रुपये प्रमाणे उद्योजकाना नुकसान भरपाई द्यावी.

# तळेगाव-चाकण-शिक्रापूर रस्त्याच्या सुधारणा प्रकल्पाबाबत अधिकृत शासन आदेश जारी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



तळेगाव-चाकण-शिक्रापूर (रा.मा. ५४८डी) या महत्त्वपूर्ण रस्त्याच्या रुंदीकरण व सुधारणा प्रकल्पाबाबत आता शासनाच्या वतीने अधिकृत आदेश जारी करण्यात आला आहे. हा निर्णय यापूर्वीच राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला होता. मात्र आता या संदर्भातील अधिकृत शासन आदेशामुळे या प्रकल्पाच्या अंमलबजावणीस औपचारिक सुरूवात होणार आहे, अशी माहिती मावळचे आमदार सुनील शेळके यांनी दिली. या निर्णयाबद्दल समाधान व्यक्त करताना आमदार शेळके म्हणाले, “मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व एकनाथ शिंदे यांनी या प्रकल्पास दिलेले सहकार्य आणि पाठबळ खरोखरच महत्त्वाचे ठरले. तिघांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने हा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतल्याने पुणे जिल्ह्यातील रस्ते विकासाला गती मिळणार आहे.” या प्रकल्पांतर्गत तळेगाव ते चाकण दरम्यान चार पदरी उन्नत रस्ता व जमिनीवर चार पदरी रस्ता, तर चाकण ते शिक्रापूर दरम्यान जमिनीवर सहा पदरी रस्ता विकसित करण्यात येणार आहे. एकूण सुमारे ५३.२ किमी लांबीच्या या मार्गासाठी शासनाने ३९२३.८९ कोटी रुपयांचा खर्च मंजूर केला आहे. हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत (MSIDC) ३० वर्षांच्या सवलत धोरणांतर्गत (Concession Model) राबवण्यात येणार आहे. प्रकल्पासाठी लागणाऱ्या जमिनीचे संपादन, पथकर वसुली आणि देखभाल व्यवस्थापनाची जबाबदारी देखील MSIDC कडेच असणार आहे.

“या मार्गामुळे मुंबई-पुणे महामार्ग आणि पुणे-संभाजीनगर महामार्ग यांच्यातील महत्त्वपूर्ण दळणवळण सुकर होणार आहे.

औद्योगिक दृष्टिकोनातून पाहता, चाकण-तळेगाव पट्ट्याला अधिक गती मिळेल.

हा निर्णय म्हणजे संपूर्ण परिसराच्या विकासाची ग्वाहीच आहे,” असे आमदार शेळके यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले, “हा निर्णय होण्यासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून मी सातत्याने पाठपुरावा करत होतो.

शासनाच्या पातळीवरून मंजुरी मिळाल्यानंतर आता अधिकृत शासन आदेश देखील निघाल्याने या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीकडे वाटचाल सुरू झाली आहे.

हा प्रकल्प वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावा यासाठी मी स्वतः लक्ष ठेवून आहे.” हा रस्ता परिसरातील नागरी आणि औद्योगिक विकासाला चालना देणारा ठरणार असल्याने नागरिकांत समाधानाचे वातावरण आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968